# जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला


## दुरध्वनी क्र. 0724-2424444 फॅक्स क्र. 0724-2435007

Email address:- rdc_akola@rediffmail.com, web address http://www.akola.nic.in


क्र.कक्ष 6(4) क.लि./पाणीटंचाई/कावि- 82 /2019 दिनांकः- 9 / 1 /2019

जाहीर ई-निविदा सूचना (दुसरी वेळ)

अकोला जिल्ह्यातील पाणी टंचाईग्रस्त ग्रामीण भागातील गावे, वाड्या, तांडे व (क) वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार खाजगी टॅकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी इच्छुक निविदाधारकांकडून ई निविदा मागविण्यात येत आहेत. निविदेबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | अकोला जिल्ह्यातील पाणी टंचाईग्रस्त ग्रामीण भागातील गावांमध्ये तसेच नगर पालिका क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार खाजगी टॅकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे |
| ऑनलाईन ई निविदा फॉर्मची किंमत | **रूपये 5000 /(अक्षरी रूपये पाच हजार फक्त)** प्रति निविदा रक्कम ऑनलाईन पध्दतीने जिल्हाधिकारी, अकोला यांचे नावाने काढून एस.बी.आय. इंटरनेट बँकिंग किंवा एन.ई.एफ.टि. व्दारे स्विकारण्यात येईल. सदर रक्कम खात्यात जमा केल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने ई निविदा फॉर्म मिळेल. |
| ईनिविदा विक्री /डाऊनलोड करण्याचा दिनांक | दिनांक 10 / 1 / 2019 सकाळी 10.00 ते 16 / 01 /2019 सायंकाळी 5 वाजेपर्यंत |
| बयानाची रक्कम | **अनामत रक्कम 1,00,000/- (अक्षरी रूपये एक लक्ष फक्त)** रक्कम ऑनलाईन पध्दतीने जिल्हाधिकारी, अकोला यांचे नावाने काढून एस.बी.आय. इंटरनेट बँकिंग किंवा एन.ई.एफ.टि. व्दारे स्विकारण्यात येईल (Scan Copy ) |
| सुरक्षा ठेव रक्कम | **रूपये 10,00,000/(अक्षरी रूपये दहा लक्ष फक्त)** सुरक्षा ठेव / राष्ट्रीयकृत बॅकेची गॅरंटी (हमीपत्र) / F.D.R. निवेदेसोबत Scan Copy Upload करावी. |
| ई निविदा ऑनलाईन भरण्याची अंतिम तारीख | दिनांक 16/ 01 / 2019 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत. |
| ई निविदा लिफाफा क्र. 1 व 2 उघडण्याचा सभाव्य दिनांक व स्थळ | दिनांक 17/ 01 / 2019 रोजी दुपारी 5.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे. |

अधिक माहितीसाठी सदर ई निविदा सूचनाबाबतची माहिती तसेच अटी व शर्ती http://www.mahatenders.gov.in व http://www.akola.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

आस्तिक कुमार पाण्डेय (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी अकोला

# <u>अटी व शर्ती खालील प्रमाणे</u>

1. कोणतीही ई-निवीदा स्विकारणे अथवा रदद करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, अकोला यांनी राखुन ठेवले आहेत.
2. सदर निवीदेबाबत निवीदाधारक मा.न्यायालयात गेल्यास त्याची कार्यकक्षा ही अकोला जिल्हा असेल.
3. प्रस्तुत ई-निवीदा सुचना http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ई-निवीदा अटी व शर्तीबाबतची माहिती http://www.akola.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
4. रु.5000/-(अक्षरी- पाच हजार रु.फक्त) प्रती निवीदा रक्कम ऑनलाईन पध्दतीने एस.बी.आय. इंटरनेट बँकींग किंवा एन.ई.एफ.टि.व्दारे भरणा केल्यानंतर दिनांक 10 / 1 /2019 वेळ सकाळी 10.00 वा. ते दिनांक 16 / 01 / 2019 रोजी वेळ सायं.5.00 वाजता ऑनलाईन पध्दतीने मिळतील, ज्या कंत्राटदारांना काळया यादया घोषित केले असेल, किंवा त्याबाबत कार्यवाही सुरु असेल त्यांनी किंवा त्याचेशी संलग्न असलेल्या कंत्राटदारांनी सदर निवीदा भरु नयेत, अशा कंत्राटदारांनी ई-निवीदा भरल्यास किंवा पुढील कालावधीत त्यांची सत्यता समोर आल्यास त्यांची ई-निवीदा रदद करण्यात येईल.
5. जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे उपस्थित कंत्राटदार यांच्या समक्ष ई-निवीदा लिफाफा क्र.1 व 2 दिनांक 17 / 01 / 2019 रोजी सायं 5.00 वा. अथवा निम्म स्वाक्षरीतांच्या सोई नुसार ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येतील. ई-निवीदा उघडण्याची तारीख व वेळ आवश्यक असल्यास बदलण्याचे अधिकार, जिल्हाधिकारी, अकोला यांनी राखुन ठेवले आहेत.
6. निवीदा दोन संच लिफाफा पध्दतीने भरावी लागेल.

जिल्हाधिकारी अकोला

# जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला

## दुरध्वनी क्र. 0724-2424444 फॅक्स क्र. 0724-2435007

Email address:- rdc_akola@rediffmail.com, web address http://www.akola.nic.in


क्र.कक्ष 6(4) क.लि./पाणीटंचाई/कावि- 82 /2019 दिनांकः -9 / 1 /2019

## सन 2018-19 टँकरने पाणी पुरवठा करण्याबाबत जाहीर ई-निविदा (दुसरी वेळ)

(पाणी पुरवठा करणा-या टॅकरबाबत शासनाचे सुधारीत दर खालील प्रमाणे आहेत.)

(पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शा.नि.क्र.टंचाई-2018/प्र.क्र.167/पापु-14 दि.19 डिसें, 2018)

| टॅकर / ट्रकवरील टाकीची पाणी वहन करण्याची क्षमता | कमाल प्रतिदिन भाडे (रुपये) | कमाल प्रति कि.मी. भाडे (रुपये ) |
|---|---|---|
| 1 मे टन | 270.00 | 3.40 |

निविदा धारकाने निवीदा सादर करतांना व्दिलिफाफा पध्दतीने सादर करावयाचा आहे. त्यापैकी अ, लिफाफा तांत्रीक बाबीचा असुन त्यात मागविण्यात आलेल्या कागदपत्रांची पुर्तता करणा-या निवीदा धारकाचा ब, दराबाबत उघडण्यात येईल.

क्रमांक 1 (अ ) **लिफाफ्यातील तांत्रीक बाबींची पुर्तता न करणा-या निवीदा धारकाचा दुसरा लिफाफा क्रमांक (ब) उघडण्यात येणार नाही .**

1

### लिफाफा अ मध्ये आवश्यक तपशिल

(अ) अनामत रक्कम 1,00,000/- (अक्षरी एक लक्ष रु. फक्त) रक्कम ऑनलाईन पध्दतीने जिल्हाधिकारी, अकोला यांचे नावाने काढून एस.बी.आय. इंटरनेट बँकिंग किंवा एन.ई.एफ.टि. व्दारे स्विकारण्यात येईल ती भरणा केल्याची पावती (Scan Copy) Upload करावी.

(ब) निवीदे सोबत 10,00,000/- (अक्षरी दहा लक्ष रु. फक्त) राष्ट्रीय कृत बँकेची बॅक गॅरंटीची स्कॅन कॉपी (Scan Copy) UPLOAD करावी. तसेच कंत्राटदारांनी पाणी पुरवठा व्यवसायाबाबत नोंदणी प्रमाणपत्राची प्रत Upload करावी.

(क) निवीदा धारकाने स्वतः च्या मालकीचे किमान 5 टॅकरची माहिती निवीदेसोबत स्कॅन करुन कॉपी सोबत जोडावी. सदर 5 टॅंकर उत्पादनाचे वर्ष हे 15 वर्षा आतील असावे (वर्ष 2004 नंतरचे ), तसेच आर.टि.ओ. चे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत,फिटनेस, इन्शुरन्स, टॅक्स पावती , PUC, वाहनाचे व्यवसाय कर इत्यादी कॉपी UPLOAD करावी. तसेच हे टॅंकर नंबर्स इतर जिल्हयास दिलेले नसावेत..

(ख) निवीदा धारकास पाणी पुरवठा कामाचा अनुभव असल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या अनुभवाचा दाखला तसेच जिल्हाधिकारी यांचे सोबत केलेल्या करारनाम्याची प्रत (Scan Copy) Upload करावी

(ग) आयकर भरल्याचे मागील 3 वर्षाचे विवरणपत्र (GST) प्रमाणपत्र,भागीदारी संस्थेच्या बाबतीत प्रत्येक भागीदाराने आयकर भरल्याबाबतचे प्रमाणपत्र स्कॅन कॉपी UPLOAD करावी

(घ) ई-निवीदा देणारी सहकारी संस्था असेल तर संस्था नोंदणी प्रमाणपत्र (उपविधी) बायलॉज सोबत जोडावे तसेच संस्थेचे रोख भांडवल किती आहे यावा तपशिल जोडावा. सहकारी संस्थेने निवीदा देतांना तीन वर्षाचा लेखा परिक्षण तपासणी अहवाल निवीदे सोबत जोडावा, तसेच इतर संस्थेकरिता दुकान नोंदणी प्रमाणपत्र हि कागदपत्रे लिफाफा अ मध्ये स्कॅन कॉपी UPLOAD करावी.

**(ड) वरील कागदपत्राच्या छायाप्रती साक्षांकीत करुन सादर कराव्यात.**

| | |
|---|---|
| 2 | **लिफाफा ब मध्ये आवश्यक तपशिल**<br>1. निवीदेसोबत देण्यात आलेल्या BOQ FILE मध्ये दर भरुन वेब साईटवर UPLOAD करावी. |
| 3 | ई-निवीदा फॉर्म अटी व शर्ती सह मान्य असल्याबाबत रु. 100/- चे बॉड पेपरवर शपथपत्र करुन शपथपत्राची प्रत (Scan Copy) UPLOAD करावी. |
| 1 | निवीदा धारकाने स्वतःच्या मालकीचे एकुण 5 टॅकरची माहिती द्यावी लागेल त्याकरिता टॅकरचे आर.टि.ओ. कडील नोदणी प्रमाणपत्राची प्रत व टॅकर मालकाचे टॅकर पुरविण्याबाबतचे 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपर वर असलेले हमी पत्र निवीदे सोबत लिफाफा अ मध्ये सादर करणे आवश्यक आहे. याशिवाय आवश्यक तेवढे टॅकर मागणी प्रमाणे पुरविणे निवीदा धारकास बंधनकारक राहील. |
| 2 | उपविभागीय अधिकारी, अकोला / अकोट / बाळापूर / मुर्तिजापूर किंवा अकोला जिल्हयातील तहसिलदार सुचना देतील त्याप्रमाणे अकोला जिल्हयातील कोणत्याही गावांना, वाडयांना, तसेच तांडयांना सुध्दा टॅकरने पाणी पुरवठा करावा लागेल. |
| 3 | वाहनासाठी डिझेल / पेट्रोल/ ऑईल पुरविण्याची जबाबदारी वाहतुक ठेकेदाराची राहील त्यासाठी आगावु रक्कम दिली जाणार नाही, तसेच कंत्राटाच्या कालावधीत इंधनाचे / वाहनाच्या सुटया भागाचे दर वाढल्यास कोणत्याही प्रकारे दर वाढ दिली जाणार नाही. |
| 4 | टॅकरने पाणी पुरवठा करण्यासाठी लागणारे इंधनाचा खर्च / इंधन अग्रीम प्रथमतःगट विकास अधिकारी (पंचायत समिती), मुख्याधिकारी (नगर परिषद ) हे अदा करतील. नंतर निविदाधारकास देयक अदा करतेवेळी देयकातून इंधन खर्च /इंधन अग्रीम कपात करुन देयक अदा करतील. परंतु,टॅकर नादुरुस्त झाल्यास दुरुस्तीचा खर्च निविदाधारकास करावा लागेल.त्यासाठी कोणतीही रक्कम शासन प्रदान करणार नाही. |
| 5 | मंजुर केलेल्या निवीदा धारकास करारनाम्याची मुदत संपल्यानंतर सुध्दा हयाच निवीदा मंजुर दराने मा.जिल्हाधिकारी यांनी मुदतवाढ दिल्यास पाणी पुरवठा करावा लागेल. |
| 6 | **निवीदा सोबत अनामत रक्कम 1,00,000/- (अक्षरी एक लक्ष रु. फक्त)** ऑनलाईन पध्दतीने जिल्हाधिकारी,अकोला यांचे नावाने एस.बी.आय. इंटरनेट बँकीग किंवा एन.ई.एफ.टि. व्दारे स्विकारण्यात येईल. |
| 7 | निवीदा मंजुर झाल्यापासुन 8 दिवसाचे आत रुपये 100 /- (अक्षरी- शंभर रुपये ) स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे आवश्यक आहे. करारनामा करुन न दिल्यास निवीदा नामंजुर करण्यात येईल. व अनामत रक्कम शासन जमा करण्यात येईल. |
| 8 | **निवीदा सोबत 1 वर्षा पेक्षा जास्त कालावधीची राष्ट्रीयकृत बॅकेची गॅरटी रुपये 10,00,000/- (अक्षरी- दहा लक्ष रु. फक्त)** सादर करणे आवश्यक आहे. |
| 9 | वाहन चालक व स्वेच्छकांच्या वेतन, भत्ते व राहण्याबाबतचा खर्च टॅकर मालकाकडुन देण्यात येईल, याबाबत या कार्यालयाची काही जबाबदारी राहणार नाही. |
| 10 | टॅकरने पाणी पुरवठा करतांना वाहनाचे लॉगबुक ठेवुन त्यावर संबंधित गटविकास अधिकारी, किंवा प्राधीकृत केलेल्या अधिका-याची दररोज लॉगबुकवर स्वाक्षरी घेणे घ्यावी लागेल, तसेच ज्या ठिकाणी पाणी पुरवठा केल्या जाईल त्या ठिकाणच्या दोन महिलांच्या दररोज स्वाक्ष–या घेणे ठेकेदारास बंधन कारक आहे. त्यानुसार भाडे व बिल आकारण्यात येईल.. |
| 11 | टॅकरने पाणी पुरवठा केल्याबाबतचे काम असमाधानकारक आढळुन आल्यास किंवा वेळेवर पाणी पुरवठा न केल्यास मंजुर निवीदाधारकाचे टॅकर बंद करण्यात येतील व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व दंड बॅक गॅरंटी मधुन वसुल करण्यात येईल. |
| 12 | पाणी पुरवठा करण्याबाबत दिलेल्या आदेशानुसार पाणी पुरवठा तात्काळ सुरु करावा लागेल. |
| 13 | टॅकर हे 24 तास सेवा या अटीवर घेण्यात येतील व 24 तास पाणी पुरवठा करावा लागेल व त्यानुसार प्रतिदिन भाडे आकारल्या जाईल. |
| 14 | पाणी पुरवठा करणा-या टॅकरला आर.टि.ओ.चे सर्व कर भरलेले असणे आवश्यक आहे, तसेच पाणी पुरवठा |

| | |
|---|---|
| | करणा-या टॅकर वरील टाकीची पाणी वहन करण्याची क्षमते बाबत ग्रामीण भागात सबंधित गट विकास अधिकारी तसेच नागरी भागात संबंधित मुख्याधिकारी किंवा उप अभियंता, (यांत्रिकी)सां.बा. (यांत्रिकी) उपविभाग, अकोला, कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. अकोला यांनी शहानिशा करुनच तपासुन घ्यावी त्यानुसार टॅकरला देण्यात येणारे प्रतिदिन व प्रति किलो मिटर भाडे 1 मे. टन एककाच्या प्रमाणात देण्यात यावे. |
| 15 | निवीदा मंजुर झाल्यानंतर जेवढे टॅकर्स सुरु करण्याविषयी आदेश दिले जातील तेवढेच टॅकर आदेशात नमुद केलेल्या कालावधीसाठीच वापरले जातील तसेच लॉगबुकप्रमाणे भाडे दिले जाईल. तसेच आवश्यकतेनुसार टॅकरने पाणी पुरवठा करणे बाबत सुचित करण्यात येईल व तो संबंधितास बंधनकारक असेल. |
| 16 | टॅकरने पाणी पुरवठा करतांना काही अपघात झाल्यास निवीदाधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलिस ठाण्यात द्यावी. अपघाताची न्यायालयीन अथवा इतर कोणतीही जबाबदारी हे कार्यालय स्विकारणार नाही. |
| 17 | निवीदाधारकाने त्याने दिलेल्या करारनाम्यातील कुठल्याही अटी व शर्तींचा भंग केल्यास त्याची अनामत रक्कम तसेच त्याने जेवढे दिवस पाणी पुरवठा केला असेल त्या दिवसाचे भाडे जप्त करण्यात येईल. व कंत्राटदाराचे नाव काळया यादीत समाविष्ठ करण्यात येईल. |
| 18 | टॅकरचे आदेश मिळाल्यापासून आवश्यक त्या क्षमतेचे टॅकर्स 24 तासाच्या आत सूचित केलेल्या तालुक्याच्या ठिकाणी, नगर पालिकेच्या ठिकाणी पाठविण्यात यावेत. या कामात कसूर झाल्यास प्रतिदिन रूपये 3000/(अक्षरी तीन हजार रुपये ) दंड आकारण्यास निविदाधारक पात्र राहील व कंत्राटदाराचे नाव काळया यादीत समाविष्ठ करण्यात येईल. |
| 19 | जिल्ह्यात पाणी पुरवठा करतांना वाहनास पडणारा Toll पथकर स्वतः (कंत्राटदाराला / ठेकेदाराला ) भरावा लागेल. |
| 20 | आयकर अधिनियम 1961 मधील अधिनियम 194 सी व वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या तरतुदीनुसार टॅकरचे भाडयापोटी देण्यात येणा-या रकमेतुन आयकर / टि.डि.एस. यांची कपात घ्यावी लागेल. व त्रैमासिक निहाय त्याचे ऑनलाईन विवरणपत्र आयकर विभागास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास तसेच कंत्राटदारास देण्यात यावी. |
| 21 | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक दि.14 फेब्रुवारी, 2018 नुसार पाणी पुरवठा करणा-या टॅंकरवर GPS प्रणाली बसविणे आवश्यक राहतील. GPS प्रणालीवर ज्या टॅंकरच्या फे-यांची नोंद होईल त्या फे-या देयकांसाठी अनुज्ञेय होतील. व ज्या पाणी पुरवठा करणा-या टॅंकरवर GPS प्रणाली नसेल आणि टॅंकरवाहतुक धारकांनी टॅंकरच्या फे-या झाल्याचा दावा केल्यास अशा फे-या बनावट ठरतील. टॅकरच्या फे-यावरील नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक टॅकर/ट्रक वर GPS यंत्रणा स्वतःच्या खर्चातून बसविण्याची तसेच सदर यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती स्वतःच्या खर्चातून करण्याची जबाबदारी ही मंजूर निविदाधारकाची राहील. |
| 22 | टॅकरने ,ट्रकने पाणी पुरवठा करतांना कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास,जिवीत किंवा वित्त हानी झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई शासनाकडून मिळणार नाही. याबाबतची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची राहील |
| 23 | जिल्हाधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर कंत्राटदाराने टॅकरने पाणी पुरवठा न केल्यास अथवा टॅकरने पाणी पुरवठ्याचे काम असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास किंवा निविदेतील कोणत्याही अटींचा भंग केल्यास कंत्राटदारास दिलेले काम काढून घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील व टॅकरने पाणी पुरवठ्यासाठी दुसया कंत्राटदाराकडून काम करुन घेतले जाईल. त्यासाठी मंजूर दरापेक्षा जादा लागणाया खर्चाची फरकाची रक्कम मूळ कंत्राटदाराकडून वसूल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील |
| 24 | कोणतीही ई निविदा पूर्णपणे किंवा त्या निविदेचा काही भाग स्विकारणे अगर नामंजूर करणे याबाबत अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवला आहे. |

| | |
|---|---|
| 25 | जर दोन किंवा अधिक ठेकेदारांनी निविदेमध्ये दिलेले दर सारखेच असतील तर प्राप्त निविदेपैकी कोणतीही ई- निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील |
| 26 | आयकर भरल्याबाबतचे अद्यावत प्रमाणपत्र व भागीदारी संस्थेच्या बाबतीत प्रत्येक भागीदाराने आयकर भरल्याबाबत अद्यावत प्रमाणपत्राची Scan Copy जोडावी. |
| 27 | टँकरने पाणी पुरवठा करण्याच्या आदेशापासुन करारनामा केल्याच्या दिनांकापासुन पुढील एका वर्षापर्यंत मुदत राहील. |
| 28 | कंत्राटधारकास अदा करण्यात येणा-या देयकातुन आयकर व वस्तु व सेवा कर (GST ) इत्यादी कराबाबत शासनाचे धोरणानुसार कपात करण्यात येईल. |
| 29 | जे दरपत्रक कंपनीने सादर केले असेल त्यावर सर्व भागीदारांनी किंवा जर कोणी भागीदार गैरहजर असेल तर त्या ज्या व्यक्ती कायदेशीर मुखत्यार पत्रधारक असतील अशा व्यक्तींनी सहमती देणे आवश्यक आहे. तसेच भागीदारी संस्था ही नोंदणीकृत असल्याबाबत सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था यांची प्रमाणित पत्र सोबत जोडावे. |
| 30 | वेळोवेळी शासन निर्णयात झालेले बदल निवीदा धारकास बंधनकारक राहतील. |
| 31 | वरील अटी व शर्ती मध्ये निवीदा फार्मस विक्री व स्विकृती चे कालावधीत फेरफार करण्याच्या तसेच काही नविन अटी व शर्ती समाविष्ठ करण्याचा तसेच काही अटी व शर्ती शिथील करण्याच्या तसेच कोणतेही कारण न देता एकतर्फी निवीदा नामंजुर करण्याचा व करारनामा संपुष्टात आणण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी यांचे कडे राखीव ठेवण्यात आला आहे तो निविदा धारकास बंधनकारक असेल तसेच निवीदा रदद करणे, पुढे ढकलणे,तहकुब करणे हा अधिकार राखुन ठेवला आहे. |
| 32 | सदर निविदेबाबत निविदाधारक मा.न्यायालयात गेल्यास त्याची कार्यकक्षा ही अकोला जिल्हा असेल. |

आस्तिक कुमार पाण्डेय (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी अकोला

जिल्हाधिकारी कार्यालय , अकोला

(पाणी टंचाई विभाग)

अकोला जिल्हयातील पाणी टंचाईग्रस्त ग्रामीण भागातील गावांमध्ये तसेच (क) नगर पालिका क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार खाजगी टॅकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेबाबतची

निविदा सन 2018-19

लिफाफा ब मध्ये नमूद करावयाचा तपशिल.

| अ.क्र | टॅकर / ट्रकवरील टाकीची पाणी वहन करण्यची क्षमता | शासन निर्णय दि.19 डिसेंबर,2018 नुसार मान्य दर | | निविदाकार कोणत्या दराने टाक्यासह ट्रक / ट्रॅकर्स उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. | |
|---|---|---|---|---|---|
| | | कमाल प्रतिदिन भाडे रु. | कमाल प्रति कि.मी. भाडे (रु) | प्रतिदिन भाडे रु. | प्रति कि.मी. भाडे (रु) |
| 1 | 1 मे.टन | 270 रु. (अक्षरी- दोनशे सत्तर रु) | 3.40 (अक्षरी- तीन रुपये चाळीस पैसे फक्त) | | |

टिप : जाहीर निविदेतील अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असून मला बंधनकारक आहेत. करीता खाली स्वाक्षरी करित आहे.

दिनांकः

निविदा धारकाची सही ------------------------------------------.

ठिकाण

निविदा धारकाचे नाव ..........................................

फर्मचे नाव व पत्ता ..........................................

अकोला जिल्ह्यातील पाणी टंचाईग्रस्त ग्रामीण भागातील गावांमध्ये तसेच (क) नगर पालिका क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार खाजगी टँकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेबाबतची

निविदा सन 2018-19

टँकर वाहनाच्या तपशिलासंबंधी विवरणपत्र

निविदाधारकाचे नाव : ------------------------

| अ. क्र. | टँकर क्रमांक | टॅक्स मुदत दिनांक | सर्टिफिकेट ऑफ फिटनेस मुदत दिनांक | इन्शुरन्स सर्टिफिकेट मुदत दिनांक | परमिट नुतनीकरण मुदत दिनांक | PUC | व्यवसाय कर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |
| 4 | | | | | | | |
| 5 | | | | | | | |

निविदा धारकाचे नाव व सही.